**Lecture on the Contribution of Tribal Leaders in the Freedom Struggle.**

# तिलकामांझी हे आदिवासी संथाल जमातीचे आद्य क्रांतिकारक : सुरंगे

**प्रतिनिधी** | जळगाव

ब्रिटिश राजवटीत भागलपूरच्या जिल्हाधिकाऱ्यास ठार करून इंग्रजांना सळो की पळो करून सोडणारे तिलकामांझी हे आदिवासी संथाल जमातीचे आद्य क्रांतिकारक आहेत. मंगल पांडे यांच्या ७० वर्षे आधी त्यांनी क्रांतीचे रणशिंग फुंकले होते, असा दावा वैभव सुरंगे यांनी केला आहे.

नूतन मराठा महाविद्यालय इतिहास विभाग व राष्ट्रीय जनजाती आयोग दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने 'आदिवासी जननायकांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. प्राचार्य डॉ. एल. पी. देशमुख अध्यक्षस्थानी होते. समन्वयक डॉ. के. बी. पाटील व्यासपीठावर उपस्थित होते. प्रारंभी बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक प्रा. वंदना पाटील यांनी केले. आदिवासी जननायकांचे परिचयात्मक ५० पोस्टर्सचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. प्रा. मंगला तायडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. विनोद पराडके यांनी आभार मानले.